
ओसिओला मॅकार्टीची संपदा



लेखन: एवलिन कोलमैन, चित्रांकन: डैनियल मिन्टर

मराठी: अश्विनी बर्वे

ओसिओला मॅकार्टीची संपदा



लेखन: एवलिन कोलमैन

चित्रांकन: डैनियल मिन्टर


मराठी: अश्विनी बर्वे



लिली मॅकलॉरीनला समर्पित, ज्यांच्याबाबत कदाचित मी लिहू शकेन. मिज़ मैकलॉरीन पहिली काळी महिला होती जिचे दक्षिणेत स्वतःचे ‘वर्तमानपत्र विकण्याचे दुकान होते. त्यांनी वर्तमानपत्र विकणाऱ्या मुलांना आणि मुलींना अशा पद्धतीने प्रशिक्षित केले की त्यांनी कामाचा सन्मान वाटायला हवा. त्यांनी आपले जीवन हैटिसबर्गच्या समुदायाला समर्पित केले.

आणि डॉ. सैन्ड्रा गिब्स, डॉ. पॉलैटा ब्रेसी, सिल्विया स्प्रिंकलर हैमलिन, सूज़ी वाइल्ड, बारबरा ब्रायन्ट, डॉ. पामेला बैरन व इतर अनेकांसाठी सुद्धा जे मुलांच्या बरोबरीने मी केलेल्या कामाची कदर करतात. - ई.सी.


अमैण्डा, शानिक, जैसिका व कीरोसाठी - डी.एम.





अनुक्रम

अध्याय १



रोज, सकाळी जेव्हा सूर्य ढगांच्या आडून निघतो आणि चंद्र डोळ्यासमोरून जातो, मैकार्टी आपल्या अंथरुणावरून पटकन उठते. खरेतर तिचे नाव ओसिओला होते, पण परिवारात सगळेजण तिला ओला म्हणत असत. ते १९१३ चे वर्ष जोते जेव्हा ओला मिसिसिपीच्या हैटिसबर्ग नावाच्या व्यग्र शहरातील आरा-मिल या गल्लीत आपल्या ज्युलिया आजी आणि एवलीन मावशी बरोबर राहण्यासाठी आली. त्या तिघी सहा खोल्या असणाऱ्या घरात राहत असत, जे नंतर त्यांचे स्वतःचे घर झाले.

ओलाला या नवीन जागेत राहायला खूप आवडले. हैटिसबर्ग मिसिसिपी केंद्रिय रेल्वेचे मुख्यालय होते. तिथे तीन मोठ्या लाकडाच्या वखारी आणि अनेक दुकाने होती. हे डी'लो हून एकदम वेगळे होते, जी जवळचीच एक छोटी गल्ली होती, जिथे ओळ आधी आपली मावशी लूसी आणि सावत्र वडिलांबरोबर राहत असे. तिचे सावत्र वडील टरपेन्टाइन उद्योगात काम करत असत.


ओलाने घाईने कपडे घातले आणि बाहेर पळाली. कामाची वेळ झाली होती. तिने कोंबड्यांना दाणे टाकले,लाकडे गोळा केली, म्हणजे जेव्हा शेकोटीची आच कमी होईल तेव्हा ती उपयोगात आणता येऊ शकतील. नंतर तिने डुकरांना खायला घातले.

आता खेळायची वेळ झाली होती. ओलाने मातीचे केक तयार केले, आपल्या छोट्या कुत्र्याबरोबर पाउट बरोबर लाल रंगाच्या जर्सी डुकराच्या मागे पळाली. घरी तयार केलेला पतंग उडवला. उन्हाळ्याच्या दिवसात ती मुळांपासून आणि लांब घासापासून आपल्यासाठी बाहुली तयार करत असे. ओलाला खेळायला आवडत असे, पण तिला खरोखर आवडत असे ते म्हणजे आपल्या आजीबरोबर करायचे काम.



कधीकधी ओला खेळणे बंद करत असे आणि आजीला मोठ्या लोखंडाच्या पातेलात कपडे टाकतांना बघत असे. त्या पातेल्याच्या खाली आजीला चूल पेटवतांना बघे. हे पातेले त्यांच्या परिवाराकडे अनेक वर्षांपासून होते, त्यात कपड्यांना उकळतांना – खदखदतांना बघे.


तेव्हा आजी एका काठीने वाफाळलेल्या कपड्यांना उचलून धुण्याच्या टबात टाके. ओलाची उंची एवढी नव्हती की तिचा हात धुण्याच्या टबा पोहचू शकेल. पण एक दिवस आजीने तिला खोक्यावर उभे केले म्हणजे तिचा हात टबा पर्यंत पोह्चू शकेल. ओला खूप खुश झाली. तिने आपला हात साबणाच्या गरम पाण्यात फिरवला, जोपर्यंत तिच्या हातात तिचे कपडे येत नाही.तिने स्वतःचे कपडे धातूच्या घासणीने वरखाली घासले. जेव्हा तिला वाटले की ते एकदम साफ झाले आहेत, तिने ते स्वच्छ पाण्याच्या पहिल्या टबात टाकले आणि मग ते पाणी हात घालून गोल गोल फिरवले. मग तो कपडा पाण्याच्या दुसऱ्या टबात टाकला. आपल्या छोट्या हातांनी जितके पिळता येईल तेवढे पिळले.



आता ती कपडे वाळवण्यासाठी दोरीवर टाकण्यासाठी तयार होती. ओला प्रथमच मोठ्या माणसांचे काम करत होती आणि त्यामुळे ती खूप खुश होती.

आजी कपडे धुण्यासाठी टबमध्ये साबण तयार करत असे. आजीला बघून बघून ओलाही साबण करायला शिकली. सगळ्यात आधी तर आजी खाण्यासाठी वापरण्यात येणारे ग्रीस टब मध्ये टाकत असे. ते उकळे पर्यंत थांबे आणि त्यात ती क्षाराचे दाणे टाकत असे. त्यातल्या गुठळ्या मोडून ते घट्ट होत नाही तोपर्यंत ती ते मिश्रण हलवत असे. मग ते मिश्रण ती एका चौकोनी ट्रे मध्ये थंड होण्यासाठी ठेवत असे. थंड झाल्यावर त्याच्या वड्या कापून वाळायला ठेवत असे. दुसऱ्या दिवशी सकाळपर्यंत साबण तयार होते असे. आजी असे मानत असे की हे काम पौर्णिमेच्या दिवशी करायला हवे नाहीतर साबण नीट तयार होत नाही.

अध्याय २



ओला हैटिसबर्गला आल्यावर काही दिवसांनी तिची आई आणि सावत्र वडील यांनी तिला आजीजवळ सोडले आणि ते शिकागोला इलिनॉय येथे गेले. ते दक्षिणेच्या इतर आफ्रिकी अमेरिकनां सारखे कष्टाळू होते. त्यांना वाटले की उत्तरेकडे गेल्यावर त्यांना चांगला रोजगार मिळू शकेल. ओला आजीबरोबर राहिल्यामुळे आजी खूप खूश होती. तिला वाटले की अपरिचित उत्तरेकडे आईवडील काम करण्यासाठी गेल्यावर ओलाला अनोळखी लोकांबरोबर राहावे लागले असते, ते योग्य नाही.

ओसिओला मैकार्टीचा पूर्ण परिवार मेहनत करण्यावर विश्वास ठेवत होता. तिची आजी आठवडयातले सहा दिवस गोऱ्या लोकांचे कपडे धूत असे आणि त्यांना इस्त्री करत असे. छोटी ओळ या कामात मदत करत असे. तिची मावशी एवलिन, गोऱ्या लोकांसाठी स्वयंपाक करत असे आणि संध्याकाळी घरी आल्यावर कुटुंबाच्या कपडे धुण्याच्या व्यवसायाला मदत करत असे.

त्याकाळात दक्षिणेत 'जिम क्रो' कायदा होता. हा कायदा गोऱ्या लोकांनी तयार केला होता आणि ते काळ्या लोकांमध्ये भेदभाव करत असत. रोज़गार, शिक्षण, एवढेच नाही तर खाणावळी, आणि सार्वजनिक संडासात सुद्धा काळ्यांना गोऱ्याइतकी समान संधी नव्हती. या कायद्यामुळे काळ्या लोकांना सगळ्यात वाईट, कमी वेतनावर खूप मेहनतीचे काम मिळत असे. हैटिसबर्गचे अनेक काळे पुरुष आरा-मिलमध्ये मजुरी करत असत आणि काळ्या बायका गोऱ्याच्या घरात. गरीब गोरे लोक सुद्धा काळ्या स्त्रियांना दिला जाणारा कमी पगार देऊ शकत असत.

काही काळ्या स्त्रिया गोऱ्या लोकांच्या कुटुंबांबरोबर राहत असत. एवढेच नाही तर त्या आपल्या मुलांना तेव्हाच भेटू शकत जेव्हा त्यांना सुट्टी असे. दुसऱ्या काळ्या स्त्रिया आपल्या घरात राहत आणि गोऱ्या लोकांसाठी दिवसभर काम करत असत. नेहमी कामावर येऊन- जाऊन करत त्यांचा दिवसच जात नसे तर पूर्ण संध्याकाळ सुद्धा त्यात जात असे. आपल्या कुटुंबाची काळजी घेण्यासाठी आणि आराम करण्यासाठी त्याच्याजवळ फक्त काही तास असत. पण ओलाची आजी घरून काम करत असल्या कारणाने ओलाबरोबर काही वेळ घालवू शकत असे. दक्षिणेच्या काळ्या स्त्रियांना घरी बसून करण्यासारखे एकमात्र काम होते ते म्हणजे गोऱ्या लोकांचे कपडे धुणे आणी त्यांना इस्त्री करणे.

त्या दिवसांत लोकांकडे कपडे धुण्यासाठी मशीन नसे. कपडे दर आठवड्याला हाताने रगडले, घासले, आणि पिळले आणि वाळत घातले जात असत. नंतर त्यांना इस्त्री केली जात असे. कपडे धुण्याचे दमवणारे काम करायला अनेक तास लागत. म्हणून ज्या लोकांना शक्य असे ते असे कंबर मोडणारे काम दुसऱ्याकडून करवून घेत.

ओला सहा वर्षाची असतांना यूरेका शाळेत शिकायला गेली. त्या शाळेत केवळ काळी मुले शिकत होती. कारण दक्षिणेतला कायदा गोऱ्या आणि काळ्या मुलांना बरोबर शिकण्याची परवानगी देत नव्हता.

ओला खूप लाजाळू होती, त्यामुळे शाळेत तिला जास्त मैत्रिणी नव्हत्या. जेव्हा ती सहावीत गेली तेव्हा तिची मावशी एवलिन गंभीर आजारी झाली. मावशीची काळजी घेता यावी म्हणून ओलाने शाळा सोडली आणि आजीने कुटुंबांचा खर्च भागावा म्हणून कपडे धुण्याचे काम चालूच ठेवले.

पुढच्या हिवाळ्यात मावशीची तब्येत सुधारली आणि ती काम करू लागली. ओलाने परत शाळेत जाण्यास सुरुवात केली. पण तिचे वर्गमित्र पुढच्या इयत्तेत गेले होते. ओलाचे मन आता शाळेत लागत नव्हते. ती दुःखी राहू लागली. तसेच तिला वाटत होते की, घरात तिची गरज आहे. त्यावेळी मुलं नेहमीच आपल्या कुटुंबाला मदत करण्यासाठी शाळा सोडत असत. ओलालाही शाळा सोडण्याची परवानगी मिळाली. आता ती धुण्याच्या कामात आजीला मदत करू लागली. ती ग्राहकांच्या घरी धुतलेले कपडे देण्यासाठी आणि धुण्याचे कपडे आणण्यासाठी जात असे. ओला कुटुंबाच्या धुण्याच्या व्यवसायात महत्वाची भाग झाली होती.



ओला आणि तिची आजी आपले काम सकाळी सात वाजता सुरु करत असे आणि रात्री अकरा वाजेपर्यंत करत असत. दुपारच्या जेवणासाठी रात्रीच्या जेवणासाठी त्या नक्कीच वेळ काढत असत. त्या हातांनी कपडे रगडत, घासत, उकळत, धूत आणि पिळत. नंतर कपडे लाकडी चिमटे लावून वाळायला दोरीवर टाकत. कपडे वाळल्यावर हे काम परत केले जात असे.

कधीकधी जेव्हा कडाक्याची थंडी पडत असे तेव्हा त्या धुतलेले कपडे आडोसा असणाऱ्या ठिकाणी वाळत घालत. नंतर त्यांनी कपडे पिळण्यासाठी एक यंत्र खरेदी केले जे हातांनी चालवले जात असे. ओला चादर दोन कोपऱ्याला रोलरच्या मध्ये अडकवत, ते तोपर्यंत फिरवे जोपर्यंत ती पूर्णपणे रोलरमधून जात नाही आणि पाणी पूर्ण निघून जात नाही. यामुळे कपडे वाळवण्यासाठी टाकेपर्यंत आधी खूप कोरडे होत.




ओलाला हवेत फडफडणारी चादर खूप आवडत असे . तिने कल्पना केली की ते एका मोठ्या जहाजाचे पाल आहेत किंवा स्वर्गातून पृथ्वीवर उतरणारे देवदूत आहेत. ओला आणि तिची आजी सोमवार ते शनिवारपर्यंत पहाटे पासून ते सूर्य अस्ताला जाईपर्यंत कपडे धुण्याचे काम करत असत. तेव्हा रविवार सोडून दररोज रात्री प्रत्येक कपड्याला इस्त्री करत. त्याकाळी कपडे कापसारख्या नैसर्गिक धाग्याने तयार होत. त्यामुळे ते वाळल्यावर त्यांना चुण्या पडत असत. त्यावेळी वाफेवरची इस्त्री नव्हती. धातूच्या जड इस्त्र्या असता ज्यांना चुलीवर गरम करावे लागे. ओला तिची आजी आणि एवलीन मावशी इस्त्री करण्यासाठी टेबलाच्या समोर जवळजवळ उभ्या राहत असत आणि कंदिलाच्या प्रकाशात रात्री उशिरापर्यंत गाणी गात, गप्पा मारत इस्त्री करत असत. जेव्हा झोपण्याची वेळ होई तेव्हा त्या शुभरात्र म्हणत आणि सकाळपर्यंत गाढ झोपत. दुसऱ्या दिवशी सकाळी परत कामाला सुरुवात होत असे.

या साऱ्या कामांवर मैकार्टी परिवारातील महिलांचे प्रेम होते. कामाशी सबंधित कृती!



अध्याय ३



ओलाला शाळेची आठवण येत असे, पण तिला कुटुंबाबरोबर राहायला पण आवडत होते. लवकरच आजी तिला कामात मदत करण्याचे पैसे देऊ लागली. मैकार्टी परिवार जास्त पैसे कमावत नव्हता. १९२० ते १९३५ पर्यंत मिसिसिपीच्या काळ्या धोबिणींना एका गाठोड्याचे ५० सेंट ते १.५० डॉलरपर्यंत पैसे मिळत असत. एका गाठोड्याचा अर्थ म्हणजे एका चादरीत जेवढे कपडे बांधले जातील तेवढे कपडे. काही लोक १.५० डॉलरच्या गाठोड्यात खूप कपडे कोंबत असत.


ओला आणि आजी मिळून एका दिवसात पाच किंवा सहा मध्यम आकाराचे गाठोडे धुवू शकत. त्यावेळी एक पौंड कॉफी पन्नास सेंटला मिळत असे, पाव १२ सेंट मध्ये, आणि साधारण बुटांची जोडी ११.५० डॉलरला. वस्तूंच्या किंमती वाढल्या तरी मैकार्टी परिवाराची मजुरी वाढली नाही, कमीच राहिली.

काळ कठीण होता, पण ओलाचे कुटुंब कामावर लक्ष देत होते. ओलाला माहीत होते की कमाई कमी असली तरी आजी काही ना काही वाचवत होती. ती आपली बचत केलेले पैसे लेस असणाऱ्या रुमालात बांधून आपल्या गादी खाली किंवा टीनच्या डब्यात कपाटात ठेवत असे. गरजेच्या वेळी आजीच्या बचतीमुळे उधार चुकवू शकत असत. ओलाला वाटे की ती मोठी झाल्यावर आजीसारखी काटकसरी व्हावे.

ओलाला माहीत होते की तिच्या कुटुंबाला बचत करण्याची किती गरज आहे. तिचे मामा जॉन, जे हैटिसबर्गमध्ये हर्क्यूलिस पावडर कॅपनीत काम करत होते, त्यांनी एवढा पैसा वाचवला की ते घर खरेदी करू शकतील. ज्यात आजी, ओला आणि मावशी राहत असत. तेव्हा त्यांनी अजून एक घर आपली बायको आणि मुलांसाठी सुद्धा खरेदी केले. थे

जेव्हा ओला अकरा वर्षाची झाली तेव्हा ती गोळ्या घेता येतील म्हणून ती पैसे वाचवू लागली. ती आपले पैसे अशा ठिकाणी लपवत असे जिथे मोठी माणसं शिवत सुद्धा नाहीत. कोणत्याही मळलेल्या बाहुलीत, अंथरुणाच्या खाली, नंतर बचत करणे ओलाच्या आयुष्याचा एक भाग झाला.


किशोरावस्थेमध्ये ओलाच्या लक्षात आले की आजी म्हातारी होत आहे आणि ती खूप दिवस काम करू शकणार नाही. तेव्हा तिने ठरवले की तिला त्या दिवसासाठी बचत करायला पाहिजे. कुटुंबाची बिले देण्यासाठी ओला नेहमी बाजारात जात असे. एकदा तिने आपले पैसे बँकेत जमा केले. ओलाचे असे म्हणणे होते की बँकेत पैसे ठेवण्याची प्रेरणा तिला ईश्वराने दिली. कारण तिच्या घरातील कोणीही बँकेत कधी पैसे ठेवले नव्हते.



ती एकटीच हैटिसबर्गच्या बँकेत गेली आणि आपले पहिले बचत खाते उघडले. घरी आल्यावर तिने आजीला आणि मावशीला आपल्या खात्याचे पासबुक दाखवले ज्यावर पहिल्यांदा जमा केलेल्या रकमेवर शिक्का मारलेला होता.

आजी आणि मावशीला हे बघून आनंद झाला की ज्या लहानग्या मुलीला त्यांनी वाढवले होते ती एक जबाबदार तरुणी झाली आहे. लवकरच त्यांनी आपली बचत देखील ओलाच्या मार्फत आपापल्या खात्यात जमा करण्यास सुरुवात केली.

ओला आणि तिच्या आजीला चर्चचे खूप महत्व वाटत असे. त्या दर रविवारी दूरवर असणाऱ्या फ्रैंडशिप बैपटिस्ट चर्चमध्ये जात असत. चर्चमधली मोठी प्रार्थना महिन्याच्या पहिल्या रविवारी असते. चर्चमधील प्रार्थना आणि गॉस्पल गायन ओलाला आनंदित करत असत आणि ताजेतवाने ठेवत असत. शेवटचे शांत भजन तिच्या मनाला शांतता आणि आराम देत असे. घरी ओला आणि तिची आजी रोज रात्री एकत्र बायबल वाचत असत.



जेव्हा ओला १३ वर्षाची झाली तिने पांढरा पोशाख, पांढरे मोजे आणि पांढरे बूट घातले आणि आपली आजी आणि चर्चच्या इतर सदस्यांबरोबर तलावाच्या किनाऱ्यावर गेली. पाद्री आणि त्यांच्या साहय्याकाने ओलाला धरले आणि थंड पाण्यात तिचे डोके बुडवले. त्यादिवशी तिचा बाप्तिस्मा झाला,हा क्षण ओला कधी विसरली नाही.


जेव्हा ओला वीस वर्षाची झाली तेव्हा तिची आई आली आणि कुटुंबाच्या धुण्याच्या व्यवसायात आजी, मावशी आणि ओला बरोबर काम करू लागली. तोपर्यंत ओलाच्या सावत्र वडिलांचे पुरात मृत्यू झाले. ओलाच्या एल्बर्टमामांनी घराच्या मागे एक धोबी घर तयार केले म्हणजे पाऊसातही धुण्याचे काम करता येईल. मैकार्टी महिला हैटिसबर्गच्या सगळ्यात उमद्या धोबिणी समजल्या जात असत. वर्षोनुवर्षे त्या कपडे धूत असत आणि त्यांची इस्त्री करत राहिल्या. त्यांना आपल्या कामाचा गर्व होता.

एकदा आजी आजारी पडली. ओला तिच्याबरोबर दवाखान्यात गेली. तिने नर्सचे पांढरे कपडे आणि टोपी बघितली. त्यांचा पोषाख तिला खूप आवडला. ओलाला वाटले की नर्स देवदूतासारखी आहे. त्यादिवसापासून नर्स होण्याची इच्छा तिच्या मनात जागी झाली. पण तिचे शिक्षण पुरेसे नाही. पहिल्यांदा ओलाला शाळेत न जाण्याचे दुःख झाले.

पण शाळेच्या शिक्षणाच्या कमीमुळे तिला दुसऱ्या गोष्टी करण्यापासून रोखले नाही. १९४०च्या दशकात तिने एका स्थानिक ब्युटीशियनकडून केस कापायला ती शिकली आणि लायसन्स काढून हेअर ड्रेसर झाली. आता ती घरीच गल्लीतल्या स्त्रियांचे केसांवर उपचार करू लागले. कुटुंबाचे कपडे धुण्याचे काम चालूच होते.

ओलाच्या आजीचा मृत्यू १९४४ मध्ये झाला. तेव्हा ओला ३६ वर्षाची होती. आजीच्या मृत्युच्या आधी ओलाने तिची देखभाल केली. ती रात्री आजीच्या अंथरुणाजवळ झोपे. म्हणजे तिला कशाची गरज पडली तर तिला आवाज द्यायला लागू नये. आजीला ओला इतकी चांगली नर्स मिळू शकली नसती.

अध्याय ४



पुढची अठरा वर्षापर्यंत ओला लोकांचे केस कापत होती, त्याच्या केसांना आकार देत होती आणि कपडे धूत होती. आजीच्या मृत्यूनंतर ओला बचत करत राहिली. तिच्या बचती मध्ये आता आजीने तिच्यासाठी जी रक्कम ठेवली होती ती ही तिच्या बचतीत जमा झाली होती. आता ओला यासाठी बचत करत होती जर तिची आई किंवा मावशी आजारी पडल्या तर त्यांच्या देखभालीसाठी उपयोगी येईल. ती दर महिन्याला बाजारात जाई म्हणजे ती बँकेत पैसे जमा करू शकेल. तिने आपल्या खात्यातून एकदाही पैसे काढले नाही.

जसजसे आजीचे आणि मावशीचे वय वाढत गेले, ओलाने आपल्या वाटेचे काम वाढवले होते. कपड्यांच्या उत्तम धुण्यासाठी तिचे नाव झाले होते. दुसऱ्या विश्वाच्या युद्धाच्या काळात शैल्बी सैनिकांचा एक ट्रक तिच्या रस्त्यावर धडधडत आला आणि तिच्या घरासमोर थांबला. त्यात बसलेल्या ऑफिसरने ओलाला म्हटले की ते व्यावसायिक लॉड्रीवाल्याच्या कपडे धुण्याबाबत असमाधानी आहेत आणि त्यांना वाटते की ओलाने त्यांचा पोषाख धुवावा. ओलाला देशासाठी कपडे धुणे इस्त्री करण्याची संधी मिळाली त्याचा तिला मोठा अभिमान वाटला. तिने आजीच्या लोखंडी भांड्यात सैनिकाचे सदरे, पॅन्ट आणि इतर कपडे धुवू लागली.

१९५० च्या दशकात लोकांच्या घरात कपडे धुण्याचे आणि वाळवण्याचे मशीन आले होते. त्यामुळे ओलाने आपल्या अधिकांश ग्राहकांचे कपडे धुण्याचे बंद केले, पण इस्त्रीचे काम करत राहिली. तिने आपल्यासाठीसुद्धा एक मशीन खरेदी केले. पण त्यावर ती खुश नव्हती. तिने आपले मशीन आपल्या नातेवाईकांना दिले.

ओलाच्या आईचा मृत्यू १९६४ मध्ये झाला आणि मावशीचा १९६७ मध्ये. ओला एकटीच कुटुंबाचा व्यवसाय चालवत राहिली. तिने वयाच्या पन्नास वर्षापर्यंत कपड़े धुण्याचे आणि त्याला इस्त्री करण्याचे काम करत राहिली. म्हणजे पहिल्या विश्व युद्धा १९३० पर्यंत

महामंदी, आणि दूसरे विश्वयुद्धापासून १९६० च्या दशकातील नागरिक अधिकार आंदोलनाच्या काळात सुद्धा. आता ओलाचे काही ग्राहक काळे सुद्धा होते. नागरिक अधिकार आंदोलनामुळे शिक्षणापर्यंत काळ्यांची पोहच वाढली होती आणि त्यांना रोजगाराच्या संधी सुद्धा मिळू लागल्या ज्या आधी त्यांना मिळत नव्हत्या. उत्पन्न वाढल्याने ते सुद्धा आपले कपडे इस्त्री करण्यासाठी टाकू शकत होते. ओलाला याचा अभिमान वाटत होता की आपल्या समुदायातल्या लोकांसाठी सुद्धा ती काम करू शकली. तिला माहीत होते की आफ्रिकी अमेरिकन लोकांनी न्याय आणि समानतेसाठी एक मोठा संघर्ष केला आणि जिंकला.

ओलाच्या कमाईत सुद्धा आता वाढ झाली होती. १९६०च्या नंतर तिने प्रती गाठोडे ५ डॉलर, तेव्हा १० आणि २० डॉलरसुद्धा मिळू लागले होते.


वर्षानुवर्षे गेले. ओला हैटिसबर्गच्या लोकांसाठी वयाच्या ८७व्या वर्षापर्यंत कपड्यांना इस्त्री करत राहिली. तेव्हा एक दिवस ती इस्त्री करत करत बेशुद्ध झाली. डॉक्टरांनी काम बंद करण्याचा सल्ला दिला. पण ओलाला सेवा निवृत्त होण्याची इच्छा नव्हती. तिला तिच्या कामात आनंद आणि समाधान वाटत होते. तिने एकदा म्हटले होते, “जर मी कामावर परत जाऊ शकले तर मी परत काम करेन.”



ओलाने लग्न केले नव्हते, त्यामुळे तिला मुलं नव्हती. तिला वाईट वाटत होते की ती आता एकटी राहिली. पण ती देवाबरोबर आपल्या नात्याचा शोध घेत राहिली.ते तिला छान येत होते.

आजीने ओलाला देवावर विश्वास ठेवायला शिकवले होते. ओला रोज घरातच बायबल वाचत असे.

ओला आपल्या सहा खोल्यांच्या घरात राहत असे, जे तिच्या जॉन मामाने १९४० च्या दशकाच्या शेवटी तिच्या नावावर घेतले होते. ती खूप साध्या पद्धतीने राहत असे पण तिच्याजवळ ते सर्व होते ज्याची तिला गरज होती. हो तिच्याकडे मोटर गाडी नव्हती, ती प्रत्येक ठिकाणी पायी जात असे. मैलभर दूर असणार्या मोठ्या सुपर मार्केट मध्ये जातांना ती आपली ढकल गाडी घेऊन जात असे. ती आपल्या झाडा झुडुपांची काळजी घेत असे. ती खूप बोलत नसे कारण तिच्या कुटुंबातले लोक आता उरले नव्हते. ती आपल्या जीवनात खुश होती. पण तिला एक खंत नेहमी वाटे की ती तिचे शिक्षण पूर्ण करू शकली नाही.



ओलाने जीवनभर आपले पैसे वाचवत राहिली. महिना दर महिना पैसे वाचवत तिची बचत वाढत गेली. तेव्हा आजी मावशी आणि आईकडून मिळालेले पैसे सुद्धा बचत खात्यात जमा झाले होते. आता ओलाच्या जवळ पुरेसे पैसे होते. तिचे वयही वाढत होते आणि एक दिवस ती ही या जगातून जाणार आहे. त्यामुळे आपल्या पैशांचे काय करायचे हा प्रश्न तिला सतावत होता.

ओलाने आपले सर्व जीवन घरात दुसऱ्यांचे कपडे धुण्यात आणि त्यांना इस्त्री करण्यात घालवले. तिने मुलांच्या कितीतरी पिढ्या शाळेत जातांना–येतांना बघितल्या होत्या. त्यांना ती संधी मिळाली जी ओलाची चुकली होती. म्हणून तिने विचार केला की आपले पैसे ती सार्वजनिक शाळेला दान करावे. पण नंतर तिने विचार केला की कॉलेजमध्ये शिक्षण घेण्यासाठी तरुण मुलांना मदत करण्याची जास्त गरज आहे. म्हणून तिने दक्षिण मिसिसिपी विश्वविद्यालयाची निवड केली कारण ते हैटिसबर्गमध्येच होते.

ओलाला वाटत होते की युवा वर्गाचे जीवन दोन गोष्टीमुळे समृद्ध होऊ शकते त्या त्यांनी समजून घेतल्या पाहिजे. पहिली गोष्ट म्हणजे जे काम ते करत आहेत ते त्यांनी चांगल्या पद्धीतीने करावे. दुसरी गोष्ट म्हणजे त्यांचे शिक्षण- ओलाला नेहमी वाटे की जर तिने आपले शिक्षण चालू ठेवले असते तर

म्हणून १९९५ च्या जुलै मध्ये ८७ वर्षाच्या ओलाने स्थानिक बँकेत एक ट्रस्ट फंड स्थापित केले. यामुळे हे निश्चित होऊ शकले की कमीत कमी १५०,००० डॉलर युनिवर्सिटी ऑफ सदर्न मिसिसिपीला मिळावे म्हणजे ते ओसिओला मैकार्टी शिष्यवृत्ती देऊ शकतील. त्यातून दर वर्षी मिसिसिपीच्या कोणत्याही शाळेच्या विद्यार्थाला काही रक्कम दिली जाईल. त्यामुळे त्यांना कॉलेजचे शिक्षण घेण्यास मदत होईल. ओलाच्या बँकरने काही रक्कम आधीच वेगळी ठेवली होती त्यातून ओला तिची काळजी घेऊ शकेल.

१९ ऑगस्ट १९९५ मध्ये ओलाने प्रथमच एका कॉलेजच्या परीसरामध्ये पाऊल ठेवले. दक्षिण मिसिसिपि विश्वविद्यालयाच्या एक हज़ार शिक्षकांनी आणि कार्यकर्त्यांनी ओला आल्यावर उभे राहून तिचे स्वागत केले. त्याच वर्षी सप्टेंबरमध्ये हैटिसबर्गच्या समुदायाने ओलाच्या औदार्याचा सन्मानासाठी ओसिओला मैकार्टी दिवस साजरा केला गेला.

ओला प्रसिद्ध झाली. लोकांना आश्चर्य वाटत होते की एका साधारण कपडे धुणारी महिला एवढी मोठी रक्कम कशी वाचवू शकली आणि त्यातील एक मोठा भाग दान म्हणून देऊ शकली. राष्ट्रपती बिल क्लिंटन यांनी त्यांना राष्ट्रपती नागरिक पदकाने सन्मानित केले. जो सामान्य व्यक्तीला दिला जाणारा देशातला सगळ्यात मोठा दुसरा सन्मान होता. ओला नवीन पोषाख घालून व्हाइट हाउसमध्ये गेली.

आतापर्यंत ओला फक्त एकदाच मिसिसिपीच्या बाहेर गेली होती. पण पुढच्या तीन वर्षात ओलाने ७४ देशातील ३४ शहरात पुरस्कार घेण्यासाठी प्रवास केला. त्या राष्ट्रीय टेलिव्हिज़नवर दिसल्या. अनेक मासिकात, वर्तमानपत्रात त्यांच्यावर लेख छापले गेले. *सिम्पल विस्डम फॉर रिच लिविंग* शीर्षकाचे पुस्तक त्यांच्या जीवनावर लिहले गेले. अनेक विश्वविद्यालयात त्यांना सन्मानित करण्यात आले. १९९६ च्या ओलम्पिक खेळाच्या काळात ओलम्पिक मशाल काही अंतरावर नेण्याचा सन्मान त्यांना मिळाला. ओलाने हे काम जीवनात प्रथमच छोटी विजार घालून केले. टेड टर्नर नावाच्या एका श्रीमंत व्यावसायिकाने म्हटले की ओलाच्या निस्वार्थ भावनेने त्यांना संयुक्त राष्ट्रसंघाला एक बिलियन डॉलर दान देण्याची प्रेरणा मिळाली. पण ओलाला तो सन्मान सगळ्यात अधिक आवडला तो होता मैम्फिस, टैनेसीच्या बैप्टिस्ट मेमोरियल हॉस्पिटल स्कूल ऑफ नर्सिंग कडून मिळालेली नर्सिंगची मानद् डिग्री।



पहिली ओसिओला मैकार्टी शिष्यवृत्ती, स्टैफनी बुलकला १९९५ मध्ये दिली गेली. स्टैफनी हैटिसबर्गच्या हायस्कूलची आफ्रिकी अमेरिकी विद्यार्थिनी होती. स्टैफनी ओलाची धर्म कन्या (गॉड डॉटर) सुद्धा झाली.

काही काळानंतर या शिष्यवृत्तीच्या तिजोरीत मोठी रक्कम जमा झाली. १९९५ च्या हिवाळ्यानंतर स्थानिक व्यावसायिक स्त्री पुरुषांनी ज्यांनी ओलाच्या हाताने धुतलेले आणि इस्त्री केलेले कपडे घातले होते त्यांनी ठरवले की ओलाने जी रक्कम दान केली आहे त्याच्या बरोबरीने रक्कम ते दान करतील. आणि त्यांनी तसे केलेही. ओलाच्या औदार्याने प्रेरित होऊन तीस राज्यातील सहाशे लोकांनी ओलाच्या शिष्यवृत्तीच्या कामासाठी रक्कम दिली. यात लवकरच ३८०,००० डॉलर इतक्या रकमेची भर पडली. आणि आता प्रत्येक वर्षी ज्यांना गरज आहे अशा सहा विद्यार्थ्यांची कॉलेज फी भरली जाते. पहिली ओसिओला शिष्यवृत्तीधारी १९९८ मध्ये पदवीधर झाली.

ओला आपले जीवन साध्या पद्धतीने जगते. ती आपले नवीन एयर-केडिशनर फक्त तेव्हाच लावते जेव्हा कोणी तिला भेटायला येते. आणि अजूनही ती आपले पैसे वाचवते.

१९९७ च्या उन्हाळ्यात जेव्हा त्यांना विचारले गेले की तुम्ही मुलांना असे काय सांगाल जे मुले नेहमी लक्षात ठेवतील. तेव्हा त्यांचे उत्तर होते: “जर तुम्ही असे काम करत असाल ज्याचा तुम्हांला अभिमान आहे तेव्हा तुमच्या मनात नेहमी आत्म सन्मान राहील.शिक्षण मिळाल्याने जास्त काही होऊ शकत नाही. काम मात्र नेहमी तुम्हांला आवडेल तेच करायला पाहिजे, त्या कामावर तुमचे प्रेम हवे.”

ओसिओला मैकार्टीचा मृत्यु २६ सप्टेंबर १९९९ मध्ये झाला.

लेखिकेच्या लेखणीतून

ओला आजही साधेपणाने आपले जीवन जगते आहे, पण तिचे जीवन बदलले आहे. तिचे दिवस त्या लोकांच्या भेटींनी भरलेले आहे जे तिच्यावर प्रेम करतात, त्यांचे म्हणणे तिला सांगतात. जेव्हा मी ओलाला तिच्या घरी भेटण्यासाठी गेले, स्टैफनी बुलक जिला पहिली ओसिओला मैकार्टी छात्रवृत्ती दिली गेली होती, ती तिच्या मैत्रिणीला घेऊन ओलाला भेटायला आली होती. नंतर जेव्हा मॉलमध्ये आम्ही बरोबर गेलो ओलाने तिथे असणाऱ्या लोकांचा हात हातात घेऊन स्मित केले. एका दुकानात काम करणाऱ्या तरुणीने तिला ओळखले आणि ती धावत आली आणि तिने आपल्या शुभेच्छा तिला दिल्या. एका भारतीय दांपत्याने तिला आपल्या दुकानात आईसक्रिम खायला बोलावले. हैटिसबर्गमध्ये तिच्या बरोबर फिरतांना प्रत्येक वंशाच्या आणि सर्व प्रकारचे काम करणाऱ्या लोकांनी ओलाला अभिवादन केले.

आम्ही रविवारी चर्चमध्ये प्रार्थना करायला गेलो. तिथे त्यांना आग्रह केला गेला की शाळेच्या मुलांना काहीतरी सांगा. त्या म्हणाल्या, “जितके शिक्षण घेता येईल तेवढे जरूर घ्या.” त्याबरोबरच हे ही सांगितले “जर मला वाचता आले असते.”

मला आशा आहे की हे पुस्तक दाखवून देईल की शिक्षण ही एक महत्वाची संधी आहे, जिचे महत्व कमी समजायला नको. थोडी थोडी बचत केल्यावरच ती बचतीची रक्कम मोठी होते आणि काम कितीही साधारण असले तरी ते अभिमान आणि समाधानाचा स्त्रोत असते.

आम्ही मुलांना सांगतो की मेहनत आणि त्यागाशिवाय काहीच मिळवता येत नाही. पण आपण अशा जगात जगत आहोत जिथे लोक केवळ वाहवाहच नाही तर दुसऱ्याची कदर सुद्धा करत नाही, जे पहाटे उठून खूप थकवणारे काम करतात. पण आम्ही त्या लोकांची वाहवाह करतो, कदर करतो जे प्रसिद्ध आहेत. मजूर, कामगार, पेट्रोल पंपावर काम करणारे, किराणा दुकानात काम करणारे, एवढेच नाही तर शिक्षकांना सुद्धा मान हलवून मौन अभिवादना शिवाय काहीच मिळत नाही.

पण हे तर गुप्त नायक आहेत, जे जगाला जगण्यासाठी लायक अशी जागा तयार करतात.

मी ओसिओला मैकार्टीच्या बाबत यासाठी लिहू इच्छित नव्हते, की त्यांनी एक विश्वविद्यालयाला एवढी मोठी रक्कम दिली, तसेच यासाठी नाही की तिने एवढी बचत केली. तर मला यासाठी लिहू इच्छित होती की ती काही सत्याचे खरे खुरे जिवंत उदाहरण आहे. प्रत्येक काम महत्वाचे असते आणि हे गरजेचे आहे की तुम्ही ज्या कामावर प्रेम करू शकाल ते काम शोधा.

जेव्हा आपण मुलांना हे शिकवतो की पैसे मिळवणे हे काम करण्याचे एकमेव कारण आहे, तेव्हा आपण त्यांना असा माणूस बनवतो की जो सन्मानजनक काम करत नाही. उलट ते असे काम करतात की त्यामुळे समाजाचे आणि जगाचे नुकसान होईल.

आपण मुलांना प्रसिद्धी किंवा पैशासाठी नाही तर समाधान आणि सन्मानासाठी काम करायला शिकवले पाहिजे. कामाच्या काळातच आपल्याला कळते की आपण कोण आहोत आणि जगाला आपल्या गुणाचा काय फायदा होत आहे.

माझे वडील नेहमी म्हणत असत की सगळी कामे सन्मानजनक असतात. काही कामे जास्त महत्वाची असतात असे म्हणणे योग्य नाही. कोणतेही काम न्यायाने आणि इमानदारीने केले की ते आपल्या श्रद्धेस आणि सन्मानास पात्र होते.

जेव्हा मुलं हे पुस्तक वाचतील तेव्हा अशी आशा वाटते की ते ओसिओला मैकार्टीच्या जीवनातून काही महत्वाच्या गोष्टी शिकतील :

वेळेवर पैसे उपयोगी पडतील म्हणून त्यांची बचत करा.

स्वतःला शिक्षित करा म्हणजे तुम्हाला जे काम करण्याची इच्छा आहे ते तुम्ही करू शकाल.

जे काम तुम्हांला आवडते त्याचा शोध घ्या आणि त्या कामाला तुमचे उत्पनाचे साधन बनवा.

तुमचे काम कोणतेही असो ते नीट करा.

दुसऱ्यांना द्या, कारण त्यामुळे तुम्हांला आनंद होईल.

आपले स्वप्नं किंवा ध्येय साध्य करण्यासाठी 'खूप वेळ ' कधीच होत नाही, मग तुमचे वय, देश, लिंग किंवा परिस्थिती काहीही असो.

- एवलिन कोलमैन



ओसिओला मैकार्टी

ओलाने आपले जीवन दुसऱ्यांचे कपडे धुण्यात, त्यांना इस्त्री करत घालवले. ती खूप कमावत नसे.तरीही तिने काही ना काही बचत केली. तिला एकाच गोष्टीची खंत होती की ती खूप कमी शिकू शकली. कारण तिला आपल्या कुटुंबाला मदत करण्यासाठी शाळा सोडावी लागली.

१९९५ मध्ये ८७ वर्षाच्या वयात एक अद्भुत काम केले. ओसिओला मैकार्टीने आपल्या गावात असलेल्या दक्षिण मिसिसिपि विश्वविद्यालयाला १५०,००० डॉलर दान म्हणून दिले. त्यामुळे युवक कॉलेजमध्ये येऊन त्यांचे शिक्षण चालू ठेवू शकतील. ही तिची कहाणी आहे.